# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)



११ जानेवारी, २०२०


# पैश्याच्या वादावरून जन्मदात्याचा खुन करणाऱ्या आरोपीस आजन्म कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन सिंदेवाही अंतर्गत घरकुलाच्या मिळालेल्या चेक आणि पैशाच्या कारणावरून स्वत:च्या वडिलाला जिवानिशी ठार करणाऱ्या आरोपीस १०/०२/२०२० रोजी **मा. श्री. वि.द.केदार, सत्र न्यायाधीश क्र. २ चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन सिंदेवाही अंतर्गत मौजा धुमनखेडा येथे दिनांक १०/०५/२०१७ रोजी यातील आरोपी नामे दिलीप रूषी धारणे वय ४५ रा. धुमनखेडा याने त्याचे वडिलाला सरकारकडुन मिळालेल्या घरकुलाच्या चेक आणि पैसे याच्या कारणावरून आपल्या वडीलासोबत वाद घालुन झगडा भांडण केले आणि भांडण करून दोरीने गळा आवळुन जिवानिशी ठार केले. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सिंदेवाही येथे अप.क्र. २१३/२०१७ कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा तपासात घेतल्यानंतर तपासी अधिकारी सपोनि. शरद सांगडे पोलीस स्टेशन सिंदेवाही यांनी आरोपी नामे दिलीप रूषी धारणे वय ४५ रा. धुमनखेडा यास अटक करून आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १०/०२/२०२० रोजी **आरोपी नामे दिलीप रूषी धारणे वय ४५ रा. धुमनखेडा यास कलम ३०२ भादंवि मध्ये आजन्म कारावासाची शिक्षा व ५,०००/—रू दंड न भरल्यास ०१ वर्ष कारावासाची शिक्षा वि.द.केदार, सत्र न्यायाधीश क्र. २ चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. संदीप नागपुरे, सरकारी अभियोक्ता** आणि कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. रमेश मुक्कावार, पोलीस स्टेशन सिंदेवाही यांनी काम पाहिले.

---